**तंत्रशिक्षण संचालनालय त्या अंतर्गत कार्यरत विविध प्रशासकीय कार्यालये तथा शासकीय व अशासकीय अनुदानित शैक्षणिक संस्थांतील पदांचा आढावा.**

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासननिर्णय क्रमांक टिईडी-८००१/(३२१/०१-भाग-३)/तांशि-५,
दिनांक : १/४/२००४

**संदर्भ :**
१. शासननिर्णय, वित्त विभाग क्र.असंक-१००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीयसुधारणा दिनांक १०.९.२००१
२. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग पत्र क्र.पदनि-१००२/प्र.क्र. १२५/२००२/वित्तीय सुधारणा-१, दिनांक २०.१२.२००२ अन्वये निर्गमित केलेले दिनांक ९.१२.२००२ रोजीच्या उच्च स्तर सचिव समितीच्या बैठकिचे कार्यवृत्त
३. शासननिर्णय क्र. टिईडी-८००१/(३२१/०१-भाग-२)/तांशि-५, दिनांक १४.१.२००३
४. शासननिर्णय क्र. टिईडी-८००१/(३२१/०१-भाग-३)/तांशि-५, दिनांक १७.१.२००३
५. दिनांक २.१२.२००३ रोजी सकाळी ११.०० वाजता झालेल्या मंत्री मंडळ बैठकीचे कार्यवृत्त
६. शासन निर्णय क्र.अकंपा-१००३/प्र.क्र.५९/२००३/आठ, दि.३०.१.२००४

**प्रस्तावना :-** उपरोक्त संदर्भ-१ मधील शासननिर्णयान्वये प्राप्त झालेल्या दिशा निर्देशानुसार उच्च व तंत्रशि विभागांतर्गत कार्यरत तंत्रशिक्षण संचालनालय, उद्योगधंदे व संस्था समन्वय संचालनालय व सदर संचालनालय निगडीत इतर प्रशासकिय कार्यालये तथा शासकिय व अशासकिय अनुदानित शैक्षणिक संस्थांतील मंजूर पदांचा आढावा घेण्यात आला. उच्च स्तर सचिव समितीने विभागाने सादर केलेल्या आढाव्यास दिनांक ९.१२.२००२ रोजी झालेल्या बैठकीत उपरोक्त संदर्भ-२ मध्ये नमुद केलेल्या कार्यवृत्तानुसार मान्यता दिली असून या मान्यतेस अनुसरुन पदांच्या आढाव्याअंती अनावश्यक ठरविण्यात आलेली पदे उपरोक्त संदर्भ-३ मधील शासननिर्णयान्वये अतिरिक्त ठरविण्यात आली आहेत.

उच्च स्तर सचिव समितीच्या मान्यतेस अनुसरुन तंत्रशिक्षण संचालनालय व त्या अंतर्गत कार्यरत विविध प्रशासकिय कार्यालये तथा शासकिय व अशासकिय अनुदानित शैक्षणिक संस्थांत रु.१२०००-१६४००/-या वेतनश्रेणी पेक्षा निम्न दर्जाची शिक्षकिय व शिक्षकेत्तर पदे उपरोक्त संदर्भ-४ मधील शासन निर्णयानुसार नवीन निर्माण करण्यात तसेच पदांच्या आढाव्याअंती आवश्यक ठरविण्यात आली असूनही शासनाच्या प्रचलित नियमानुसार व्यपगत झालेली पदे पुनर्जिवीत करण्यात आली आहेत.

उपरोक्त संदर्भ-१ मधील शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदर आढाव्याअंती रु.१२०००-१६४००/- या वेतनश्रेणीपेक्षा उच्च दर्जाची पदे उच्च स्तर सचिव समितीच्या मान्यते नंतर मंत्री मंडळाच्या मान्यतेने निर्माण करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

**शासननिर्णय :-**

प्रथम टप्प्यातील रु.१२०००-१६४००/- या वेतनश्रेणीपेक्षा उच्च दर्जाची २४४ शिक्षकीय व २ शिक्षकेत्तर पदांच्या पदनिर्मितीचा प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास उपरोक्त संदर्भ-५ मध्ये नमुद केलेल्या कार्यवृत्तानुसार दिनांक २.१२.२००३ रोजी झालेल्या मंत्री मंडळाच्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली आहे. मंत्री मंडळाने मान्यता प्रदान केलेल्या विविध संस्थांतील शिक्षकीय पदांच्या पदनिर्मितीपैकी वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली या संस्थेतील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमातील प्राध्यापक यंत्र व सहाय्यक प्राध्यापक यंत्र या पदनामाच्या प्रत्येकी ९ पदांऐवजी फक्त प्रत्येकी १ पदास केंद्र शासनाचे अनुदान उपलब्ध असल्याने या संस्थेत सदर पदनामाची प्रत्येकी एकच पद निर्माण करणे शक्य होईल. याप्रकारे उपरोक्त संदर्भ-४ मधील शासन निर्णयाच्या प्रपत्र-ड मधील प्रस्तावीत २४६ पदांच्या पदनिर्मीती पैकी वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली या संस्थेतील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमातील प्राध्यापक यंत्र व सहाय्यक प्राध्यापक यंत्र या पदनामाची प्रत्येकी ८ पदे वगळून उर्वरित २३० पदांच्या पदनिर्मीतीस शासन मान्यता देत आहे.

तंत्रशिक्षण संचालनालयाचा आढावा सुरु असताना व्ही.एन.आय.टि., नागपूर हि संस्था केंद्र शासनाने अभिमत विद्यापीठ घोषित केल्यामुळे व वाटूमल इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग ॲन्ड कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी, वरळी मुंबई हि शासनाची अनुदानित संस्था विनाअनुदानित संस्थेत रुपांतरित झाल्याने सदर दोन्ही संस्थांतील मंजूर पदे सदर आढाव्यातून वगळण्यात आली आहेत

सद्यःस्थितीत उपरोक्त संदर्भ-३ मधील शासन निर्णयातील अतिरिक्त पदे वगळून व संदर्भ-४ मधील नवनिर्मित तथा सदर शासन निर्णयान्वये सोबत जोडलेल्या प्रपत्र-अ मध्ये नमुद केलेल्या नवनिर्मित पदांसह तंत्रशिक्षण संचालनालय व त्या अंतर्गत कार्यरत प्रशासकीय कार्यालये, शासकिय तथा अशासकिय अनुदानित पदवी व पदविका संस्था व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे, जिल्हा रायगड, या महाराष्ट्र शासनाच्या अनुदानावर कार्यरत विद्यापीठातील एकुण ११९८ पदांचा एकत्रित गोषवारा सोबतच्या प्रपत्र-ब मध्ये नमुद केला आहे.

प्रपत्र-ब मधील नमुद केलेली शासकीय तथा अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी आवश्यक शिक्षकीय पदांच्या वेतनासाठी केंद्र शासनाचे अनुदान उपलब्ध असल्याने सदर पदांच्या आवश्यक वेतनासाठी राज्य शासनाच्या अनुदानाची आवश्यकता राहणार नाही. सदर पदांवरील खर्च केंद्र शासनाकडून संबंधीत संस्थांत परस्पर उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्र-ब मध्ये नमुद केलेली सर्व शिक्षकीय पदे तथा उपरोक्त संदर्भ-६ मधील शासन निर्णयात नमुद केलेल्या तरतुदीनुसार सर्व शिक्षकेत्तर पदे तातडीने भरण्याची कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासननिर्णय अनौपचारीक संदर्भ क्र.३७८/२००३ व्यय-५, दिनांक ४.७.२००३ अन्वये प्राप्त वित्त विभागाच्या सहमतीने तथा उपरोक्त संदर्भ-१ मधील शासन निर्णयानुसार पदांच्या आढाव्यासाठी गठीत करण्यात आलेल्या संयुक्त सचिव समिती व उच्च स्तर सचिव समिती व दिनांक २.१२.२००३ रोजीच्या बैठकीत मंत्री मंडळाने दिलेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( मनीषा शिंत्रे )
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपूर व नाशिक
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई
सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई
प्राचार्य, सर्व शासकिय तंत्रनिकेतने आणि तत्सम तंत्रशिक्षण संस्था (तंत्रशिक्षण संचालकामार्फत )
प्राचार्य, सर्व शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालये व तत्सम शैक्षणिक संस्था (तंत्रशिक्षण संचालकामार्फत)
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )महाराष्ट्र १/२ , मुंबई /नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
सर्व कोषागार अधिकारी
वित्त विभाग (व्यय-५),(अर्थसं-११),( वित्तीय सुधारणा )
निवडनस्ती/तांशि-५, व्यशि-५

संस्था/कार्यालयाचे नांव : शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती

| | पदनाम | एकूण मंजूर पदे | | | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| | | स्थायी | अस्थायी | एकूण | |
| | **पदवी अभ्यासक्रम** | | | | |
| १. | प्राचार्य | -- | १ | १ | १६४००-२२४०० |
| २. | प्राध्यापक स्थापत्य | १ | १ | २ | १६४००-२२४०० |
| ३. | प्राध्यापक उपयोजित यंत्रशास्त्र | -- | १ | १ | १६४००-२२४०० |
| ४. | प्राध्यापक यंत्र | -- | ३ | ३ | १६४००-२२४०० |
| ५. | प्राध्यापक विद्युत | -- | ३ | ३ | १६४००-२२४०० |
| ६. | प्राध्यापक अणुविद्युत | -- | २ | २ | १६४००-२२४०० |
| ७. | प्राध्यापक संगणक | -- | २ | २ | १६४००-२२४०० |
| ८. | प्राध्यापक माहिती तंत्रज्ञान | - | १ | १ | १६४००-२२४०० |
| ९. | सहा. प्राध्या. यंत्र | १ | ५ | ६ | १२०००-१८३०० |
| १०. | सहा. प्राध्या. विद्युत | १ | ५ | ६ | १२०००-१८३०० |
| ११. | सहा. प्राध्या. स्थापत्य | -- | ४ | ४ | १२०००-१८३०० |
| १२. | सहा. प्राध्या. उपयोजित यंत्रशास्त्र | -- | ३ | ३ | १२०००-१८३०० |
| १३. | सहा. प्राध्या. संगणक | - | ४ | ४ | १२०००-१८३०० |
| १४. | सहा. प्राध्या. अणुविद्युत | -- | ५ | ५ | १२०००-१८३०० |
| १५. | सहा. प्राध्या. उपकरणीकरण | -- | २ | २ | १२०००-१८३०० |
| १६. | सहा. प्राध्या. माहिती तंत्रज्ञान | -- | ३ | ३ | १२०००-१८३०० |
| १७. | सिस्टीम मॅनेजर/ॲडमिनिस्ट्रेटर | -- | १ | १ | १२०००-१८३०० |
| १८. | अधिव्याख्याता स्थापत्य | ३ | ५ | ८ | ८०००-१३५०० |
| १९. | अधिव्याख्याता उपयोजित | -- | ६ | ६ | ८०००-१३५०० |
| २०. | अधिव्याख्याता यंत्र अभि. | ३ | ८ | ११ | ८०००-१३५०० |
| २१. | अधिव्याख्याता विद्युत | १ | १० | ११ | ८०००-१३५०० |
| २२. | अधिव्याख्याता अणुविद्युत | १ | ९ | १० | ८०००-१३५०० |
| २३. | अधिव्याख्याता पदार्थ विज्ञान | १ | ३ | ४ | ८०००-१३५०० |
| २४. | अधिव्याख्याता उपकरणीकरण | - | ६ | ६ | ८०००-१३५०० |
| २५. | अधिव्याख्याता धातुशास्त्र | १ | -- | १ | ८०००-१३५०० |
| २६. | अधिव्याख्याता भूशास्त्र | -- | १ | १ | ८०००-१३५०० |
| २७. | अधिव्याख्याता संगणक | -- | ८ | ८ | ८०००-१३५०० |
| २८. | अधिव्याख्याता रसायनशास्त्र | -- | ४ | ४ | ८०००-१३५०० |
| २९. | अधिव्याख्याता गणित | -- | ४ | ४ | ८०००-१३५०० |
| ३०. | अधिव्याख्याता माहिती तंत्रज्ञान | -- | ७ | ७ | ८०००-१३५०० |
| ३१. | कार्यशाळा अधिक्षक | -- | १ | १ | ८०००-१३५०० |
| ३२. | सिस्टीम ॲनालिस्ट | -- | १ | १ | ८०००-१३५०० |
| | **पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम** | | | | |
| ३३. | सहाय्यक प्राध्यापक विद्युत | --- | १ | १ | १२०००-१८३०० |

## शिक्षकेत्तर पदे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | प्रशासकीय अधिकारी | -- | १ | १ | ७४५०-११५० |
| ३५. | प्रबंधक | १ | -- | १ | ६५००-१०५० |
| ३६. | ग्रंथपाल | -- | १ | १ | ८०००-१३५० |
| ३७. | सहाय्यक ग्रंथपाल | -- | १ | १ | ३२००-४९० |
| ३८. | प्रोग्रामर | -- | १ | १ | ५५००-९०० |
| ३९. | कार्यदेशक | -- | १ | १ | ५५००-९०० |
| ४०. | अधिक्षक | -- | १ | १ | ५५००-९०० |
| ४१. | मुख्य लिपीक | -- | १ | १ | ५०००-८०० |
| ४२. | लघुलेखक | -- | १ | १ | ४०००-६०० |
| ४३. | प्रभारक | २ | -- | २ | ४५००-७०० |
| ४४. | विजतंत्री | १ | १ | २ | ४०००-६०० |
| ४५. | वीजमिस्त्री | -- | १ | १ | ४०००-६०० |
| ४६. | जोडारी | १ | -- | १ | ४०००-६०० |
| ४७. | कातारी | १ | -- | १ | ४०००-६०० |
| ४८. | लोहार | -- | १ | १ | ४०००-६०० |
| ४९. | यानेकार | -- | १ | १ | ४०००-६०० |
| ५०. | सुतार | १ | -- | १ | ४०००-६०० |
| ५१. | उपकरण अभिरक्षक | -- | १ | १ | ४०००-६०० |
| ५२. | भांडारपाल | -- | ३ | ३ | ४५००-७०० |
| ५३. | तांत्रिक सहाय्यक | -- | १ | १ | ४०००-६०० |
| ५४. | बंधकार | १ | -- | १ | ४०००-६०० |
| ५५. | संधाता | -- | १ | १ | ४०००-६०० |
| ५६. | यंत्रकारागीर/यांत्रिक कर्मशाळा | -- | १ | १ | ४०००-६०० |
| ५७. | वरिष्ठ प्रयोगशाळा सहाय्यक | - | ४ | ४ | ४०००-६०० |
| ५८. | पत्रे व नळ कारागीर | -- | १ | १ | ४०००-६०० |
| ५९. | प्रयोगशाळा सहाय्यक | ५ | १७ | २२ | ३२००-४९० |
| ६०. | वरिष्ठ लिपिक | २ | ४ | ६ | ४०००-६०० |
| ६१. | कनिष्ठ लिपिक/रोखपाल/भांडार लिपीक/टंकलेखक | २ | ९ | ११ | ३०५०-४५९ |
| ६२. | वाहनचालक | - | १ | १ | ३०५०-४५९ |
| ६३. | ग्रंथालय परिचर | २ | -- | २ | २५५०-३२० |
| ६४. | इंजिन परिचर | -- | १ | १ | २५५०-३२० |
| ६५. | पंप परिचर | -- | १ | १ | २५५०-३२० |
| ६६. | पहारेकरी | ~~२~~ | ~~५~~ | ~~७~~ | २५५०-३२० |
| ६७. | सफाईगार | १ | ९ | १० | २५५०-३२० |
| ६८. | शिपाई | -- | ८ | ८ | २५५०-३२० |
| ६९. | शेत परिचर दर्जा २/शेत परिचर | ५ | ४ | ९ | २५५०-३२० |
| ७०. | माळी | -- | १ | १ | २५५०-३२० |
| ७१. | हमाल | १९ | १२ | ३१ | २५५०-३२० |
| | एकूण | ५९ | २१४ | २७३ | |

**तंत्रशिक्षण संचालनालय त्या अंतर्गत कार्यरत विविध प्रशासकीय कार्यालये तथा शासकीय व अशासकीय अनुदानित शैक्षणिक संस्थेतील पदांच्या आढाव्या अंती दुसऱ्या टप्प्यामध्ये नवीन शिक्षकीय पद निर्माण करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्र.टिईडी-२००६/८७७२/(६५/०६)/तांशि-५

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक : २९ जून , २००७

संदर्भ :

१) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.असंक-१००१/प्र.क्र.२१/२००१/वित्तीय सुधारणा , दि.१०.९.२००१

२) संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.५(३)/पदांचा आढावा/२००१/२६८४०, दिनांक ६.११.२००१

३) संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.५(३)/पदांचा आढावा/२००१/५९७६ दिनांक ६.११.२००१

४) संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.५(३)/पदांचा आढावा/२००१/४५७८, दिनांक ६.११.२००१

५) संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.५(३)/पदांचा आढावा/२००१/, दिनांक ६.११.२००१

६) शासन निर्णय क्र.टिईडी-८००१/(३२१/०१)/तांशि-५, दिनांक ७.११.२००२ अन्वये निर्गमित केलेले दिनांक १२.७.२००२ रोजीच्या संयुक्त सचिव समितीच्या बैठकीचे कार्यवृत्त

७) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग पत्र क्र.पदनि-१००२/प्र.क्र.१२५/२००२/वित्तीय सुधारणा-१, दि.२०.१२.२००२ अन्वये निर्गमित केलेले दिनांक ९.१२.२००२ रोजीच्या उच्च स्तर सचिव समितीच्या बैठकीचे कार्यवृत्त.

८) शासन निर्णय क्र.टिईडी-८००१/(३२१/०१-भाग-२)/तांशि-५, दि.१४.१.२००३

९) शासन निर्णय क्र.टिईडी-८००१/३२१/०१-भाग-३)/तांशि-५, दि.१७.१.२००३

**प्रस्तावना :** तंत्रशिक्षण संचालनालय त्या अंतर्गत कार्यरत विविध प्रशासकीय कार्यालये तथा शासकीय व अशासकीय अनुदानित शैक्षणिक संस्थेतील पदांचा आढावा घेतल्यानंतर उच्चस्तर समितीने दिलेल्या मान्यतेला अनुसरुन काही शिक्षकीय पदे टप्प्याटप्प्याने निर्माण करण्यास संयुक्त सचिव समिती व उच्चस्तर समितीने मान्यता दिली आहे.शासकीय तथा अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्थांमधील प्रस्तावित १०२० शिक्षकीय पदांपैकी पहिल्या टप्प्यात निर्माण करण्यात आलेली शिक्षकीय पदे सोडून उर्वरीत ४०० पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. उक्त ४०० पदांमधून ज्या संस्थांचा समावेश जागतिक बँक सहाय्यित तंत्रशिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी भारत सरकारच्या कार्यक्रमामध्ये झालेला आहे त्या संस्थांमधील ८३ पदे व काळाच्या ओघामध्ये आवश्यक नसलेली १६ पदे अशी एकूण ९९ पदे वगळून शासन निर्णय वित्त विभाग क्र.पदनि-१००८/प्र.क्र.१२५/२००२/वित्तीय सुधारणा-१ दि.२० डिसेंबर, २००२ अन्वये निर्गमित केलेल्या दि.९.१२.२००२ रोजी झालेल्या उच्चस्तर सचिव समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तात नमूद केल्याप्रमाणे, रु.१२,०००-१६,५०० या वेतनश्रेणीतील व त्यापेक्षा जास्त वेतनश्रेणीत असलेल्या एकूण ३४ पदे व त्यापेक्षा कमी वेतनश्रेणीची एकूण २६७ पदे अशी एकूण ३०१ शिक्षकीय पदांच्या निर्मितीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :** प्रस्तुत प्रकरणी उच्च स्तर समितीने मान्य केलेल्या एकूण ३०१ शिक्षकीय पदांच्या निर्मितीच्या प्रस्तावास मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे. सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षापासूनच या सर्व पदांची आवश्यकता असल्याने, त्यांच्या वेतनापोटी एकूण ३०१ शिक्षकीय पदांचा जुलै महिन्याच्या वेतनासाठी आकस्मिकता निधीतून अग्रिम घेण्याचा प्रस्ताव वित्त विभागास सादर केला होता. सदरहू प्रस्तावास वित्त विभागाने मंजूरी दिली आहे. यास्तव सोबत जोडलेल्या विवरणपत्र अ मध्ये नमूद केलेल्या दुसऱ्या टप्प्यातील रु.१२०००-१६५०० या वेतनश्रेणीतील व त्यापेक्षा जास्त वेतनश्रेणी असलेली एकूण ३४ पदे व विवरणपत्र " ब " मध्ये नमूद केलेल्या रु.१२०००-१६५०० या वेतनश्रेणी पेक्षा कमी वेतनश्रेणीची एकूण २६७ पदे अशा एकूण ३०१ शिक्षकीय पदनिर्मितीस शासन याद्वारे मान्यता देत आहे.

२. वरीलप्रमाणे पदनिर्मिती करण्यासाठी येणारा खर्च मागणी क्र.डब्ल्यू-३-२००३-तंत्रशिक्षण, उपशिर्ष :-

१. १०४ अशासकीय तंत्रमहाविद्यालये व संस्थांना सहाय्य (०१) परिरक्षण अनुदाने १०४(०१)(०२) तंत्रनिकेतने (२२०३ ०१५ ८) ३१ सहाय्यक अनुदाने

२. १०४ अशासकीय तंत्रमहाविद्यालये व संस्थांना सहाय्य १०४(०१)(०३) अभियांत्रिकी महाविद्यालये (२२०३ ०१६ ७) ३१ सहाय्यक अनुदाने

३. १०५ तंत्रनिकेतने १०५ (००)(०१)शासकीय तंत्रनिकेतने (२२०३ ०२० २ )

४. ११२-अभियांत्रिकी तंत्र महाविद्यालये संस्था-११२(००)(०१)/शासकीय अभियांत्रिकी व वास्तूशास्त्र महाविद्यालये (वसतीगृहासहीत) (२२०३ ०३२ ७)

या शिर्षाखाली आकस्मिकता निधी अग्रिमातून उपलब्ध झालेल्या एकुण रु.२५ लाख इतक्या निधीमधून खर्ची टाकण्यात यावा. आकस्मिकता निधी अग्रिमातून देयक सादर करतांना "८०००-२८६-८" या संगणक संकेतांकाचा वापर करावा.

३. नियंत्रक अधिकारी यांना असेही कळविण्यात येते की, त्यांनी आकस्मिकता निधीतून खर्च करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकाऱ्याकडे रक्कम सुपूर्द करण्याच्या आदेशात अग्रिमाच्या रक्कमेतून खर्च करतांना सादर करण्यांत येणाऱ्या देयकावर आकस्मिकता निधी अग्रिम शासन ज्ञापन वित्त विभाग, क्र.आकनि ११.०७/२६/अर्थसंकल्प-६, दि.२८ जून, २००७ अन्वये मंजूर "असे लाल शाईने लिहावे ",अशी स्पष्ट सूचना अंतर्भूत करावी व सूचनाही लाल शाईने अधोरेखित करावी. आकस्मिकता निधीतून काढलेल्या अग्रिमातून करावयाच्या खर्चाबाबत महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिकेतील प्रकरण १६ मध्ये विशद केलेल्या नियमांची व शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.सीएनएफ/१०८३/१४०/अर्थसंकल्प-३, दि.२६.४.१९८३ व सी.एन.एफ-१०८६/१५३/अर्थसंकल्प-३, दि.२८.८.१९८६ अन्वये देण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. आकस्मिकता निधीतून काढलेल्या अग्रिमातून खर्च केल्याची माहिती त्यांनी

त्या महिन्या नंतरच्या १० तारखेपर्यन्त वित्त विभाग, अर्थसंकल्प-३, मंत्रालय, मुंबई यांना नमूना ब (महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिकेतील परि.१८९ मध्ये सादर करावे.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३३९/२००७ व्यय-५, दि.१६.६.२००७ व ६१५/०७/अर्थसंकल्प-६, दि.२१.६.२००७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर आदेश शासनाच्या संकेतस्थळ www.maharashtragovt.in वर ठेवण्यात आले असून, त्याचा संगणक संकेतांक २००७०५१५११५००४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(कांतीलाल उमाप)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / औरंगाबाद /अमरावती/ नागपूर व नाशिक
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई
सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई
प्राचार्य, सर्व शासकीय तंत्रनिकेतने आणि तत्सम तंत्रशिक्षण संस्था (तंत्रशिक्षण संचालकांमार्फत)
प्राचार्य, सर्व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये व तत्सम शैक्षणिक संस्था (तंत्रशिक्षण संचालकांमार्फत)
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
सर्व कोषागार अधिकारी
वित्त विभाग (व्यय-५), (अर्थसं-१९),(वित्तीय सुधारणा)
निवडनस्ती / तांशि-५,

# विवरणपत्र अ

शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण क्र.टिईडी-२००६/८७७२/(६५/०६)/तांशि-५, दि. २९.६.२००७ च्या सोबतचे विवरणपत्र.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | पदनाम | वेतनश्रेणी | मंत्रीमंडळासमोर सादर करावयाची पदे |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १. | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड | प्राध्यापक माहिती तंत्रज्ञान | १६४००-४५०-२०९००-५००-२२४०० | १(एक) |
| | | सहाय्यक प्राध्यापक माहिती तंत्रज्ञान | १२०००-४२०-१८३०० | १(एक) |
| | | प्रशि.व आस्था.अधिकरी (सहा.प्राध्या.) | १२०००-४२०-१८३०० | १(एक) |
| २. | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद | प्राध्यापक माहिती तंत्रज्ञान | १६४००-४५०-२०९००-५००-२२४०० | १(एक) |
| | | सहायक प्राध्यापक माहिती तंत्रज्ञान | १२०००-४२०-१८३०० | २(दोन) |
| ३. | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती | प्राध्यापक विद्युत | १६४००-४५०-२०९००-५००-२२४०० | १(एक) |
| | | प्राध्यापक उपकरणीकरण | १६४००-४५०-२०९००-५००-२२४०० | १(एक) |
| | | प्राध्यापक माहिती तंत्रज्ञान | १६४००-४५०-२०९००-५००-२२४०० | १(एक) |
| | | सहाय्यक प्राध्यापक माहिती तंत्रज्ञान | १२०००-४२०-१८३०० | २(दोन) |
| | | प्रशि.व आस्था. अधिकारी (सहा.प्राध्या.) | १२०००-४२०-१८३०० | १(एक) |

## विवरणपत्र ब

शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.टिईडी-१००६/८७७२/(६५/०६)/तांशि-५, दि. .६.२००७ च्या सोबतचे विवरणपत्र.

रु.१२००० पेक्षा कमी वेतन असलेले शिक्षकीय पदे

| अ. क्र. | संस्थेचे नांव | पदनाम | वेतनश्रेणी | मंत्रीमंडळा समोर सादर करावयाची पदे |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १. | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड | अधिव्याख्याता, स्थापत्य | ८०००-२७५-१३५०० | १(एक) |
| | | अधिव्याख्याता विद्युत | ८०००-२७५-१३५०० | १(एक) |
| २. | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद | अधिव्याख्याता, विद्युत | ८०००-२७५-१३५०० | २(दोन) |
| | | अधिव्याख्याता संगणक | ८०००-२७५-१३५०० | १(एक) |
| | | अधिव्याख्याता माहिती तंत्रज्ञान | ८०००-२७५-१३५०० | ३(तीन) |
| ३. | शासकीय अभियांत्रिकी महा. अमरावती | अधिव्याख्याता माहिती तंत्रज्ञान | ८०००-२७५-१३५०० | २(दोन) |
| ४. | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगांव | अधिव्याख्याता स्थापत्य | ८०००-२७५-१३५०० | १(एक) |
| | | अधिव्याख्याता, धातुशास्त्र | ८०००-२७५-१३५०० | १(एक) |
| ५. | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर | अधिव्याख्याता स्थापत्य | ८०००-२७५-१३५०० | १(एक) |
| | | अधिव्याख्याता विद्युत | ८०००-२७५-१३५०० | १(एक) |
| ६. | एस.पी.कॉलेज ऑफ इंजि., मुंबई | अधिव्याख्याता विद्युत | ८०००-२७५-१३५०० | २(दोन) |